Peer Reviewed Referred and UGC Listed Journal
(Journal No. 40776)


ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - I

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com




Ajanta Prakashan

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | एकविसाव्या शतकातील राज्यघटने समोरील आव्हाने<br>**डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड** | १-५ |
| २ | एकविसाव्या शतकातील भारतीय लोकशाही : आव्हाने आणि पुढील वाटचाल भारतीय लोकशाही समोरील आव्हाने<br>**प्रा डॉ. कविता सोनकांबळे** | ६-९ |
| ३ | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने<br>**प्रा. डॉ. कल्पना हनुमंतराव घारगे** | १०-१४ |
| ४ | नागरी समाज व लोकशाही<br>**डॉ. दिपक एस. वाघमारे** | १५-१८ |
| ५ | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने<br>**डॉ. बिरंगणे एस. एस.** | १९-२१ |
| ६ | भारतीय अर्थव्यवस्था : एक चिंतन<br>**डॉ. पांडुरंग व्ही. पांचाळ** | २२-२५ |
| ७ | नागरी समाज आणि भारतीय लोकशाही<br>**प्रा. दिक्षीत एस. डी.**<br>**प्रा. डॉ. पिंपळे बी. एस.** | २६-२९ |
| ८ | समाज लोकशाही आणि स्त्रिया<br>**आरती धनवे** | ३०-३४ |
| ९ | भारतीय न्यायपालिका २१ व्या शतकातील आव्हाने<br>**डॉ. दाणे बी. एल.** | ३५-३७ |
| १० | भारतीय लोकशाही पुढील आव्हाने<br>**प्रा. कांबळे शिवाजी ईरबा** | ३८-४० |
| ११ | भारतीय लोकशाहीपुढील आव्हाने व उपाय<br>**सुभाष पोले** | ४१-४६ |
| १२ | भारतातील लोकशाही : आव्हाने व बळकटीकरणासाठी आवश्यक बाबी<br>**महेशकुमार एकनाथ जाधव** | ४७-५१ |
| १३ | लोकशाही व राष्ट्रीय एकात्मता<br>**प्रा. डॉ. एस. के. लेखणे**<br>**प्रा. डॉ. एस. ई. देगलुरकर** | ५२-५४ |




Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# १३. लोकशाही व राष्ट्रीय एकात्मता

**प्रा. डॉ. एस. के. लेखणे**
लोकप्रशासन विभाग प्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर, ता. बिलोली, जि. नांदेड.
**प्रा. डॉ. एस. ई. देगलुरकर**
मराठी विभाग, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शंकरनगर, ता. बिलोली, जि. नांदेड.

जगातील सर्वात मोठी लोकशाही प्रभावीपणे राबविणारा देश म्हणून भारताकडे बघितले जाते. प्रचंड अशा विविधतेतून एकात्मता निर्माण करणारा देश म्हणून जागतिक स्तरावर भारताची ओळख आहे. देशातील जनतेच्या जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणणारी लोकशाही हे भारतीय शासनप्रणालीचे वैशिष्ट्य असून लोकांच्या सहभागातून राज्यव्यवस्थेवर निर्णायक स्वरुपाचा प्रभाव भारतीय लोकशाहीतून वेळोवेळी प्रत्ययास आलेला आहे.

असे असले तरी भारतीय लोकशाहीसमोर आज अनेक समस्याही आहेत. या समस्यांपैकी महत्वाची समस्या ही राष्ट्रीय एकात्मतेच्या अभावाची समस्या होय. भारत स्वतंत्र्य झाल्यापासून सतत राष्ट्रीय एकात्मतेचा घोष केला जात आहे परंतु ती पदरात पडल्याचे मुळीच दिसत नाही. उलट राष्ट्राला तडे जात आहेत. पाचशेच्या वर असलेली संस्थाने विलीन करून एक राष्ट्र निर्माण करण्याच्या प्रसंगी असलेले वातावरण लोप पावून विघटनाची प्रवृत्ती हिंसक वळण घेत असलेली दिसते. आपला प्रांत, आपली जात, आपली भाषा, आपला धर्म यांच्या संदर्भात असलेली आत्मीयता स्वार्थांध बनत असून संकुचित व राष्ट्रविघातक वळण घेत आहे. आर्थिक विकास, सक्षम प्रशासन, वैज्ञानिक विकास, दारिद्रय निर्मूलन अशा विविध समस्यांहून अग्रक्रमाची ही विषमतेची व विघटनेची समस्याच होय. धर्मांधता व जातीवाद यांचा वापर राजकीय स्वार्थासाठी होत आहे.

वस्तुतः स्वातंत्र्य, समता व बंधुता ही लोकशाहीचे बल वाढविणारी त्रिसूत्री आहे. केवळ निवडणुका आणि सरकारे यांनी लोकशाहीचे बळ वाढत नाही. न्यायाची भावना विकसित करणारी नीतिमत्ता वाढल्यावाचून स्वातंत्र्य हे अर्थपूर्ण होणार नाही. समाजात न्याय हा सर्वांना समान असेल तरच तो खरा न्याय होय. अशा न्यायातच समतेचे तत्व सामावलेले असते. आपल्या वाट्याला न्याय आला आहे ही भावना निर्माण होईपर्यंत स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या मुल्यांची ख-या अर्थाने प्रतिष्ठापना होणार नाही आणि एकात्मताही साध्य होणार नाही.

अनेक धर्मातील माणसे स्वतःच्या धर्मातील लोकासाठी कार्य करतात, स्वधर्मी लोकांवरच उपकार करण्याची त्यांच्या जीवनातील प्रश्न सोडवण्याची परोपकारी वृत्ती त्यांच्याजवळ असते. परंतु तीच माणसे इतर धर्माच्या गरजू लोकांवर उपकार करणे अयोग्य समजतात. त्यांच्याबद्दल द्वेषाची भावना बाळगतात. अशा मनोवृत्तीने लोकशाहीला अभिप्रेत असलेली समता आणि बंधुत्व निर्माण होणे अशक्यप्राय ठरते. आजच्या संदर्भात हे अत्यंत विसंगत आहे. आधुनिक जीवनातील दळणवळणाची साधने, आधुनिक तंत्रज्ञान यांमुळे विविध धर्माची, वंशांची व विविध देशांमधील माणसे परस्परांच्या संबंधात येत आहेत. आंतरराष्ट्रीय स्तरावर माणसाला माणूस म्हणूनच ओळखले जात आहे. अशावेळी भारतासारख्या खंडप्राय देशातील विविधतेत असलेला भेदभावनेचा दोष लोकशाहीला पोखरून टाकताना दिसतो.



Scanned with CamScanner

आपली लोकशाही विकसित करावयाची असेल तर परस्पर द्वेषमूलक भेदभाव विसर्जित करणे अत्यंत महत्वाचे ठरते.

लोकशाहीच्या राजकारणात राजकीय पक्ष अपरिहार्यपणे असतात. लोकांच्या कल्याणासाठी सुयोग्य अशा प्रतिनिधींची निवड होण्यासाठी हे राजकीय पक्ष आवश्यकच असतात. परंतु हेच राजकीय पक्ष समाजात भेदाची भावना निर्माण करून दुही माजवितात असेही दिसते. प्रत्येक राजकीय पक्ष हा सत्ता संपादन करण्यासाठी प्रयत्नशील असतो आणि ती सत्ता संपादन करता यावी यासाठी तो सातत्याने जनसामान्यांची दिशाभूल करीत असतो. याचा अर्थ असा होतो की लोकशाहीचे अपत्य म्हणून जन्माला येणारे राजकीय पक्ष हे लोकशाहीलाच दुर्बलही करत असतात. धर्मसंस्थांचा, जातीसंस्थांचा व जनतेतील अज्ञान, दारिद्र्य, विषमता यांचा राजकीय स्वार्थासाठी वापर करून घेतला जातो. ब्राह्मण - ब्राह्मणेतर, मराठा - मराठेतर, स्पृश्य - अस्पृश्य अशा अनेक प्रकारच्या सामाजिक विषमतेला खतपाणी घालणा-या वादांमध्ये व भेदभावांमध्ये हिंदु - मुसलमान भेद हा भारतीय लोकशाही समोरील फार मोठे आव्हान ठरला आहे.

भारतात अनेक भाषा, अनेक धर्म, यांच्या संघातातून एक विशाल संस्कृती नांदत आलेली आहे. हिंदु, मुस्लिम, शिख, जैन, बौध्द अशा विविध धर्मपंथाची वाढ या ठिकाणी सतत एकमेकांच्या सान्निध्यात झालेली आहे. त्यांच्यात काही परस्परविरोधी अशी वैशिष्ट्ये असल्यामुळे त्यांच्यात संघर्षही होत आले आहेत. त्यामुळे स्वतंत्र अहंकार व भेद तयार झाले आहेत.

पण त्यांच्यातील एकात्मता अनेक वर्षापासून अबाधित होती. काही स्वार्थी प्रवृत्तींनी त्यांच्यात भेदाचे विष पेरले असल्यामुळे आज पूर्वीची समरसता बाधित होत आहे. प्राचीन काळातील भारतीय धर्म व साहित्याने राष्ट्रीय एकतेचे स्वाभाविक व अनौपचारिक शिक्षण दिलेले आहे. खरे पाहिले तर आज हिंदू - मुसलमान यांच्यामधील दुरावा मतांच्या राजकारणामुळे वाढला आहे. मते मागणारे राजकारणी लोग हिंदु-मुस्लिमांच्या मतपरिवर्तनाची, त्याद्वारे त्यांच्यातील परस्परद्वेष मिटवण्याची कामे करत नाहीत. उलट जे काही धार्मिक - ऐतिहासिक भ्रम आहेत त्यांनाच उजाळा दिला जातो. हिंदूना वाटते की 700-800 वर्षापासून मुस्लिम राज्य होते हिंदूवर अत्याचार झाले. उलट मुस्लिमांना वाटते की आमचे इथे 700-800 वर्षे राज्य होता आता आम्हाला वाईट दिवस आले. परंतु यासंदर्भात राम मनोहर लोहिया यांचे विचार अत्यंत महत्वाचे आहेत.

रजिया, शेरशाह, जायसी, वगैरह हम सबके पुरखे हैं, हिंदू मुसलमान दोनों के। लेकीन उसके साथ-साथ मै चाहता हूँ कि हममे से हर एक आदमी, क्या हिंदू क्या मुसलमान, यह कहना सीख जाए कि गजनी, गोरी और बाबर लुटेरे थे और हमलावर थे। इतिहासाकडे बघण्याचा असा दृष्टीकोन निर्माण झाला तर हिंदू-मुस्लिम हे एकमेकांना तोडण्याच्या नजरेने पाहणार नाहीत जोडण्याच्या दृष्टीने पाहतील.परंतु अशी दृष्टी दोन्ही समाजात निर्माण होत नाही . गजनी, बाबर, घोरी यांना मुसलमान लोक लुटेरे मानत नाहीत तर रजिया, शेरशाह, जायसी यांना आपले पूर्वज मानायला हिंदू तयार होत नाहीत. तसे त्यांना मानू देण्यास राजकारणी तयार नाहीत. त्यामुळे हिंदु व मुस्लिमांचे मत परिवर्तन घडवून आणणे आजच्या मतांच्या राजकारणात अत्यंत अवघड झालेले आहे.

गांधीजींच्या सामुदायिक प्रार्थनेचा आशय स्पष्ट करताना दादा धर्माधिकारी म्हणतात जेंव्हा आपण **ईश्वर अल्ला तेरे नाम** असे म्हणतो, त्याचा अर्थ असा असतो की आपल्याला या देशात एका सामान्य नागरिकत्वाची उभारणी करावयाची असून ती संप्रदाय - निराकणावाचून होणार नाही. आपला संकल्प असा आहे की या देशात धर्म, संप्रदाय, जात, स्त्री-पुरूष असे कुठलेच भेद राहणार नाहीत. सगळयांना नागरिकत्वाचे सामान्य बरोबरीचे अधिकार असतील. संप्रदाय वादातून आपल्या देशात



Scanned with CamScanner

द्विराष्ट्रवाद आला आणि त्याचे पर्यवसान सांप्रदायिक निर्वाचन पद्धतीत झाले शेवटी त्यातूनच पाकिस्तान निर्माण झाले. त्यामुळे ईश्वर - अल्ला ही एकाच परमेश्वराची दोन नावे आहेत असे सांगणा-या मध्ययुगीन संतांच्या आध्यात्मिक लोकशाहीचे महत्व विशेषत्वाने जाणवते.

संत साहित्यातील लोकशाहीचा आवाज मध्ययुगात संपूर्ण भारतात घुमला होता. संतांनी जातिधर्मातीत असे अध्यात्म लोकभाषेतून साकार केले होते. ज्ञानेश्वरांच्या भाषेत **संत तेथे विवेका असणे की जी** हे लोकशाहीच्या दृष्टीने आवश्यक असलेले अंग होते. विचार स्वातंत्र्य, आचार स्वातंत्र्य लोकशाहीमध्ये आवश्यक असते व ते नागरिकांना प्राप्तही असते पण ते स्वातंत्र्य वापरणारा लोकशाहीचा नागरिक हा विवेकी असावा लागतो. असा विवेक लोकशिक्षणातून व विवेकी विचारांच्या वारशामधून विकसित होत असतो. परंतु अशा लोकोपकारक व समाजोन्नतीस पोषक असलेल्या विवेकाचा अभाव हाच जातीजातीत व धर्माधर्मात तेढ निर्माण करीत असलेला दिसतो.

भारतीय लोकशाही अधिकाधिक प्रबल आणि सुस्थिर होण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रयत्नातील सर्वात महत्वाचा टप्पा म्हणजे भारतातील हिंदू मुस्लिमांचे ऐक्य निर्माण करणे हा होय. या संदर्भात विचार व्यक्त करताना थोर विचारवंत डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे यांचे चिंतन असे आहे. हिंदु मुसलमानाचे ऐक्य घडविण्याचा महत्वाचा व मुख्य मार्ग म्हणजे मुस्लिम समाजात आमूलाग्र मानसिक परिवर्तन घडून येणे हा होय. आणि त्या परिवर्तनाचे मुख्य साधन म्हणजे राममोहन, आगरकर, विवेकानंद यांनी हिंदू समाजात प्रस्तुत केलेली बुध्दिवादी विचारसरणी हे होय.

अशी बुध्दिवादी विचारसरणी ज्यांच्यात विकसित झालेली आढळते ते **रेझा ऊल करीम** नावाचे लेखक **पाकिस्तान एक्झॅमिन्ड** या पुस्तकात लिहितात.

मुसलमानांना अनेक शतके या भूमीन पोसले आहे. त्यांचा आता अरबस्तान, इराण या देशांशी काही एक संबंध नाही. आता हिंदुस्थान हीच आमची मातृभुमी आहे. वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत ही माझीच धनदौलत आहे. रामसिता, अशोक, अकबर, कालिदास, अमीर खुसरो ही माझी थोर परंपरा आहे. हिच्यापासून मला कोणीही तोडून काढू शकणार नाही. तिच्यात काही दोष असतीलही पण ती माझी म्हणूनच मला प्रिय आहे. आज भारतीय लोकशाहीस मुख्य आवश्यकता अशाच भावनेची व बुध्दिवादाची आहे.

**संदर्भ ग्रंथ**

1) जागर - नरहर कुरूंदकर
2) सर्वोदयदर्शन - दादा धर्माधिकारी.
3) लोकशाही समाजवाद - अशोक मेहता.
4) महाराष्ट्रातील लोकशाही विचार - मा. पं. मंगुडकर.
5) ग्रंथावली - राम मनोहर लोहीया
6) भारतीय राज्यव्यवस्था - भा. ल. भोळे



Scanned with CamScanner